# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)

ईमेल : dbee@sus.ac.in ✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

परीक्षा व मूल्यमापन मंडळ Board of Examinations and Evaluation


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 2935
Ref. No. : PAHSU/BOEE/ 2935

दिनांक : 14 DEC 2023
Date :

वाचा- कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्र. ४१८ यांचे पत्र क्र. संकीर्ण-२०२३/सं.क्र.४२२/विशि/-३ दि. १ डिसेंबर, २०२३ रोजीचे प्राप्त पत्र.

## परिपत्रक

उपरोक्त संदर्भिय पत्रानूसार, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी आजी-माजी विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र तात्काळ उपलब्ध करुन देणेबाबत कळविले असल्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सलंग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, सर्व संकुलाचे विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग तथा संबंधित सर्व आजी-माजी विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र घेतले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र मिळणेसाठी ऑफलाईन पद्धतीने अर्ज करण्याची सुविधा विद्यापीठात उपलब्ध असून गरजू विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा. प्राचार्य, संचालक यांनी सदरची बाब तात्काळ विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ.एम.एस.राकडे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :-
१) श्री. प्र.ना ढवळे, कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई.
२) मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/ विद्यापीठ संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग ,मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक४ १८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र.०२२-२२७९३१७१

क्रमांक: संकीर्ण-२०२३/सं.क्र.४२२/विशि-३ दिनांक: ०१ डिसेंबर, २०२३

प्रति,

मा.कुलगुरू,
सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय : आजी-माजी विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र तात्काळ उपलब्ध करून देणेबाबत.
संदर्भ: श्री. नागेश किसनराव निमकर यांचा अर्ज दि.१६.११.२०२३

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भाधीन अर्जाची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

तरी, सदर अर्जातील विनंतीच्या अनुषंगाने तात्काळ आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

सोबत: वरीलप्रमाणे

आपला,

(प्र. ना. ढवळे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत: १. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२. निवडनस्ती (विशि-३)

प्रती,
मा.श्री. विकासचंद्र रस्तोगी,
प्रधानसचिव उच्च शिक्षण, मंत्रालय, मुंबई-३२

अर्जदार :- नागेश किसनराव निमकर
घर नं. १३७६, सुंदरम अपार्टमेंट, चौधरी कंपाउंड,
कामतघर, ता. भिवंडी, जि. ठाणे. मो.नं.: ९३२०८९९९५५

दि.: १६/११/२०२३

**विषय :- पदवीक्रम शिकलेल्या आजी-माजी विद्यार्थ्यांना पदवीप्रमाणपत्र तात्काळ उपलब्ध करुन देणेबाबत.**

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने, पुढील १० महिन्यानंतर विधानपरिषदेची कोकण पदवीधर व मुंबई पदवीधर निवडणुक लागणार असुन सदर पदवीधर मतदान हे व्यवस्थित पदवीधर मतदार नोंदणी न झाल्यामुळे अनेक पदवीधर या मतदानापासून वंचित असतात, कारण अनेक पदवीधारांचे पदवीप्रमाणपत्र हे ज्या-त्या विद्यापीठांमध्ये रखडुन पडलेले आहेत, विद्यापीठांमार्फत फीसाठी पत्र तथा दुरध्वनीद्वारे फोन केले जातात, परंतु त्या विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्र युनिर्वसिटीकडून काही कालांतराने आल्यानंतर संबंधित विद्यापीठे कुठलेही माहिती विद्यार्थ्यांना देत नाही आणि त्यामुळे हे पदवी प्रमाणपत्र प्रत्येक विद्यापिठांमध्ये संबंधित शैक्षणिक संस्थांमध्ये धुळ खात पडत असते. यशवंत राव चव्हाण मुक्त विद्यापीठ यांच्याकडे तर गेले कित्येक वर्षाचे पदवीप्रमाणपत्र धुळ खात पडले असुन त्यांच्याकडुन पदवीप्रमाणपत्र मिळणेसाठी कुठलीही माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन दिली जात नाही, कारण यांच्या ज्या परीक्षा आहेत त्या वेगवेगळ्या शैक्षणीक संस्थांमधुन होत असतात परंतु पदवी प्रमाणपत्र कुठल्या विद्यापीठामधुन मिळेल याची माहिती व जागरुकता यशवंतराव चव्हाण विद्यापीठ यांच्याकडुन केली जात नाही तथा वर्तमानतपत्रातुनसुध्दा जाहिरात दिली जात नाही. याचप्रमाणे ईतर शैक्षणिक संस्था व विद्यापीठ सुध्दा पदवी झालेल्या संबंधित विद्यार्थ्यांना सुध्दा पदवी प्रमाणपत्र घेणेसाठी त्यांना दुरध्वनीद्वारे फोनही करत नाही अथवा त्यांना पत्राद्वारे सुचनाही करत नाही, तर मला एवढेच सांगायचे आहे की, एक सुशिक्षित पदवीधर विधानपरिषद सदस्य विधानसभेत निवडुन जाण्यासाठी जास्तीत जास्त मतदान होणेसाठी त्यांची मतदान नोंदणी होणे आवश्यक आहे त्यासाठी त्यांना पदवीप्रमाणपत्राची आवश्यकता असते. त्यामुळे या सर्व विद्यापीठांवरती अंकुश ठेवणारे सरकारी यंत्रणा सर्व शिक्षण अधिकारी यांनी तात्काळ एक पत्रक काढुन सर्व शिक्षण संस्थांना पदवी प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना घेऊन जाण्यासाठी सर्व खाजगी व सरकारी शिक्षण संस्थांकडुन विद्यार्थ्यांना त्यांच्या पत्यावर पत्रक काढण्यात यावे व त्यांना सूचित करावे की संबंधित तालुक्यातील तहसिलदार (निवडणुक विभाग) यांच्याकडे पदवीधर मतदान नोंदणी तात्काळ करावे, हि विनंती.

आपला विश्वासु

नागेश किसनराव निमकर

Received in


पदवीधर
नागेश निमकर
कोकण पदवीधर मतदार संघ

मध्यवर्ती टपाल केंद्र
मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
अ.क्र.....................
दिनांक:- 1/11/23

O/c

प्रती,
**मा. मुख्य निवडणुक निर्णय अधिकारी (विधानसभा-लोकसभा)**
**मंत्रालय, मुंबई-३२**

**अर्जदार :- नागेश किसनराव निमकर**
**घर नं. १३७६, सुंदरम अपार्टमेंट, चौधरी कंपाउंड,**
**कामतघर, ता. भिवंडी, जि. ठाणे. मो.नं.: ९३२०८९९९५५**

**दि.: १/११/२०२३**

Shinde 1/11/23
अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय विधान भवन, मुंबई/नागपूर

**विषय :- मुंबई पदवीधर व कोकण पदवीधर मतदार संघातील जुने व नविन मतदार नोंदणीची मुदत ३१ जानेवारीपर्यंत वाढवुन मिळणेबाबत.**

**महोदय,**

वरील विषयाच्या अनुषंगाने, मुंबई पदवीधर व कोकण पदवीधर मतदार संघामध्ये पदवीधर मतदार हे जास्त करुन सरकारी व निमसरकारी नोकरी पेशे असून ते सोमवार ते शुक्रवार सकाळी १० वाजल्यापासून ते सायंकाळी ६.३० पर्यंत नोकरीसाठी कामावर जात असतात आणि पदवीधर मतदार नोंदणी चे कार्यालय हे सुध्दा सोमवार ते शुक्रवार याच वेळेत उपलब्ध असल्यामुळे कामावर सुट्टी करुन मतदार नोंदणी पदवीधरांना करावी लागत आहे, शासनाने त्याबाबत गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. आपण दिलेली ठराविक वेळ ही काही दिवसातच संपणार असुन त्यामुळे अनेक जुने व नविन पदवीधरांना मतदानासाठी नोंदणी करणे कठीण झालेले आहे, आपल्या विभागाने नोकर-चाकरमनी यांचा थोडा सुध्दा विचार केलेला नाही, इतकेच नव्हे तर महाराष्ट्रात सरकारी कर्मचारीसुध्दा जे नव्याने पदवीधर झालेले आहेत त्यांनासुध्दा मतदान नोंदणी करणे अडचणीचे झालेले आहे, कोकण पट्ट्यातील तालुका स्तरावरती पदवीधर मतदार नोंदणी जी चालु आहे ती शनिवार व रविवारीसुध्दा ठेवण्यात यावी, अशी माझी कळकळीची विनंती आहे. तसेच आपल्याकडुन पदवीधर मतदार नोंदणीसाठी जो अर्ज देण्यात आलेला आहे त्यामध्ये (१) आधार कार्ड, (२) लाईट बिल, (३) घर पावती किंवा घरभाडे करारनामा, (४) मतदान कार्ड, (५) पदवी प्रमाणपत्र याची मागणी करण्यात आलेली आहे. (६) छायांकित फोटो याची मागणी त्यामध्ये केलेली नाही व छायांकित फोटो कसा असावा जेणेकरुन मतदार यादी तयार झाल्यानंतर तो फोटो स्पष्ट दिसावा असे कुठलेही माहिती सदर अर्जात दिलेली नाही, त्यामुळे नोकरी पेशे व चाकरमनी यांची भांबेरी उडुन जाते व त्यांना चार वेळा खेटे मारावे लागतात. त्यामुळे पदवीधर मतदार नोंदणी फार कमी संख्येने झालेली आहे. पदवीधरांमध्ये सदर मतदान नोंदणीबाबत कुठलीही जागृती करण्यात आलेली नाही. त्यामुळे ३१ जानेवारी २०२४ पर्यंत पदवीधर मतदार नोंदणी वाढवुन देण्यात यावी व सतत जाहिरात करण्यात यावी, जेणेकरुन जास्तीत जास्त पदवीधरांना मतदानात सहभाग घेता येईल व जुने नविन जे पदवीधर मतदार आहेत त्यांची संख्या वाढल्याने चांगले आमदार विधानपरिषदेत निवडुन जातील, याची दखल निवडणुक विभागाने तात्काळ घ्यावी व पदवीधर मतदान नोंदणीची तारीख वाढवुन शनिवार रविवारसुध्दा मतदार नोंदणीची प्रक्रिया प्रत्येक तहसिल कार्यालयात चालु ठेवावी, अशी माझी विनंती आहे.

**प्रतरवाना,**
**१) मा. एकनाथ शिंदे साहेब, मुख्यमंत्री, मंत्रालय, मुंबई-३२**
**२) मा. आयुक्त, निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२**
**३) मा. राहुलजी नार्वेकर, अध्यक्ष विधानसभा, विधानमंडळ, मुंबई-३२**
**४) मा. डॉ. निलम गोन्हे, उपसभापती विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई-३२**

**आपला विश्वासु**

**नागेश किसनराव निमकर**

1/11/2023
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२
2) 01/11/23

1/11/23
लिपिक
मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड
हुतात्मा राजगुरू चौक मंत्रालय
मुंबई